॥ जाहल्या कांहीं चुका ॥

गायिका: लता मंगेशकर
गीत: मंगेश पाडगांवकर
संगीत: श्रीनिवास खळे

जाहल्या कांहीं चुका अन् सूर कांहीं राहिले
तूं दिलेलें गीत माझें आवडीनें गायिले ॥ धृ. ॥

चांदण्यांच्या मोहरानें रात्र केव्हां दाटली
काजळी काळ्या ढगांनी हांक केव्हां घातली
मी स्वरांच्या लोचनांनी विश्व सारें पाहिलें ॥ १ ॥

सौख्य माझें, दुःख माझें, सर्व माझ्या भावना
मोर स्वप्नांचे निळे अन् विंधणाऱ्या वेदना
मी असें गीतांतुनी सर्वस्व माझें वाहिलें ॥ २ ॥

संपता पूजा स्वरांची हात तूं देशील का
दाटुनी काळोख येतां तूं घरीं नेशील का
पूर्णतेसाठींच या मी सर्व कांहीं साहिलें ॥ ३ ॥